# आशा ” स्वयंसेविका

**श्रीमती रत्ना भाऊराव उघडे**
**वय वर्ष - ३५**
**गाव - पांजरे, उपकेंद्र -उडदावणे**
**प्राथमिक आरोग्य केंद्र - शेंडी**
**तालुका - अकोले**
**जिल्हा - अहमदनगर**

अहमदनगर जिल्हयातील अकोले तालुक्यात **प्रा.आ.केद्र शेंडी** अंतर्गत **पांजरे** या अतिदुर्गम गावातील श्रीमती रत्ना भाऊराव उघडे ही आशा म्हणुन काम करत आहे. तिच वय ३५ वर्षे असुन शिक्षण ५६ वी आहे. ती शेती (मोलमजुरी) पण करत होती. रत्नाला मुळतः समाजकार्याची आवड आहे. गावात कोणतेही प्रशिक्षण असल्यास ती सगळयांच्या पुढे नाव देण्यास तयार असे. तसेच त्या प्रशिक्षणाचा उपयोग ती आपल्या गावासाठी करत असे. प्रशिक्षणासाठी काही आर्थिक फायदा असो वा नसो ती प्रशिक्षणाला हजर राहात असे. ”आशा” म्हणुन नेमणुक होण्यापुर्वी ती ४ ते ५ वर्षापासुन तिने पाडा स्वयंसेविका म्हणुन काम केलेले होते. तिच्या कामाचा अनुभव व कामाची इच्छा लक्षात घेवुन तिचे शिक्षण कमी असुनही तिला ”आशा” स्वयंसेविका म्हणुन नियुक्त करण्यात आले.

आशाच्या या गावात माहे जुलै २००९ मध्ये तापाची साथ आली तिला प्रशिक्षणात दिल्याप्रमाणे व आरडीके चा वापर या माध्यमातुन तिने मलेरीयाकरीता रक्ताची तपासणी केली व लागोपाठ ४ ते ५ केसेस दोनच दिवसात पॉझिटिव्ह आल्या. ती समक्ष रुग्ण व आरडीके घेऊन प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांचेकडे आली. व त्यांनी तिचा रिपोर्ट व रुग्णांचा रक्त नमुना घेवुन तपासणी केली असता रुग्ण PVTG चे +ve निघाले. व गावात तेथुन पुढे सर्वेक्षण करुन माहे.जुलै.२००९ अखेर एका महिन्यात २२ रुग्ण सापडले. त्या गावात एनआरएचएम अंतर्गत आरोग्य सेविकेची नियुक्ती केलेली आहे. सेविका मुख्यालयी राहते. उपकेंद्राच्या रेग्युलर एएनएम तेथे मुख्यालयी राहतात परंतु सर्वेक्षणाच्या अभावामुळे हे कोणाच्याही लक्षात आले नाही. व आशाच्या जागरुकतेमुळे त्या गावात सर्वेक्षण होवुन एकही मृत्यु झाला नाही, हे आपण टाळु शकलो. सदरील काम अतिशय कौतुकास्पद आहे. ही मौलिक कामगिरी ची माहिती आपणास सविनय सादर.